**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक ०५ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **एसटी महामंडळाच्या अतिरीक्त जमिनींचा व्यापारी तत्त्वावर वापर करायच्या सुधारित धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी.**
2. **नागपूर विणकर सहकारी सूतगिरणीच्या १ हजार १२४ कामगारांना ५० कोटींचे सानुग्रह अनुदान मिळणार.**
3. **मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतलेल्या १४ हजार पुरुषांना पैसे परत करण्याची राज्य सरकारची नोटीस.**

**आणि**

4. **प्रवाश्यांची वाढती गर्दी बघता, नागपुरातील बर्डी ते बुटीबोरी गावापर्यंत 'आपली बसची' फेरी सुरू.**

**आता सविस्तर बातम्या .......**

एसटी महामंडळ

राज्य सरकारनं एसटी महामंडळाच्या अतिरीक्त जमिनींचा व्यापारी तत्त्वावर वापर करायच्या सुधारित धोरणाला मंजुरी दिली आहे. राज्य मंत्रीमंडळाच्या आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरणालाही सरकारनं मान्यता दिली आहे. कुष्ठरुग्णांसाठी कार्यरत स्वयंसेवी संस्थांचं अनुदान प्रति रुग्ण २ हजारांवरून ६ हजार रुपये करायलाही मंत्रीमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. दरम्यान चालकाला सन्मानजनक मोबदला आणि प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची हमी देणारे राज्य शासनाचे अधिकृत यात्री ॲप लवकरच एसटी महामंडळ मार्फत सुरू करण्यात येत आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

नागपूर विणकर सहकारी-मंत्रिमंडळ निर्णय

नागपूर विणकर सहकारी सूतगिरणीच्या १ हजार १२४ कामगारांना ५० कोटींचे सानुग्रह अनुदान मिळणार असल्याचा निर्णय आज झालेल्या मंत्री मंडळ बैठकीत घेण्यात आला. सुतगिरणीच्या जमीन विक्रीतून निधीची तरतूद केली जाणार आहे.

उमेद मॉल

राज्यातल्या ग्रामीण महिला बचत गटांच्या उत्पादनांना स्थायी बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी 'उमेद मॉल' उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला असून, त्याचा थेट फायदा महिला बचत गटांच्या आर्थिक सक्षमीकरणाला होणार आहे, असं ग्रामविकास आणि पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितलं. ते काल यासंदर्भातल्या बैठकीत बोलत होते. या उपक्रमाअंतर्गत पहिल्या टप्प्यात दहा जिल्ह्यांमध्ये उमेद मॉल्स उभारण्यात येणार असून, त्यांची नाव लवकरच जाहीर केली जातील, असं त्यांनी सांगितलं.

कर्तव्य भवन

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्लीत कर्तव्य पथावरील कर्तव्य भवनाचं उद्घाटन करणार आहेत. यावेळी होणार्या सार्वजनिक कार्यक्रमात ते संबोधित करतील. कर्तव्य भवन हा सेंट्रल व्हिस्टाच्या माध्यमातून घडवलेल्या व्यापक परिवर्तनाचा एक भाग आहे. प्रशासनिक प्रक्रिया सुव्यवस्थित करण्यासाठी आणि गतिमान प्रशासन अधिक सक्षम करण्यासाठी सामान्य केंद्रीय सचिवालय इमारती उभारण्याची सरकारची योजना असून, त्यापैकी कर्तव्य भवन ही पहिली इमारत आहे. विविध मंत्रालयं आणि विभाग सध्या दिल्लीमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी असून, त्यामुळे कामं पूर्ण करण्यात अडथळे येतात आणि त्याला विलंबही होतो. त्यामुळे हे विभाग आणि मंत्रालयं एकाच ठिकाणी आणण्यात आली आहेत.

युपीआय

युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस अर्थात UPI वरून केल्या जाणाऱ्या दैनंदिन व्यवहारांनी पहिल्यांदाच ७० कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया-NPCI नं प्रसिद्ध केलेल्या ताज्या अहवालानुसार, २ ऑगस्ट रोजी UPI व्यवहारांची संख्या सुमारे ७० कोटी ७० लाख रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

हर घर तिरंगा

दरवर्षीप्रमाणेच यंदाही येत्या स्वातंत्र्य दिनानिमित्त हर घर तिरंगा मोहीम राबवण्यात येणार आहे. सर्वांनी तिरंगा ध्वज फडकवावा, त्यासोबतचा आपला सेल्फी ‘हर घर तिरंगा डॉट कॉम’ या संकेतस्थळावर अपलोड करावा, असं आवाहन सरकारनं केलं आहे. या मोहिमेसाठी कार्यकर्ता म्हणून नोंदणी गेल्या शनिवारपासून सुरू झाली असल्याचं सरकारी पत्रकात म्हटलं आहे.

वृक्ष वाचवा

सक्करदरा येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या नवीन इमारतीकरिता अडथळे ठरणाऱ्या वृक्षांच्या कपातीची परवानगी मागण्यात आली आहे. नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी आज या परिसराची पाहणी केली. पाहणीदरम्यान डॉ. चौधरी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला आणि मनपाच्या उद्यान विभागाला बांधकाम करताना पुरातन वृक्ष वाचविण्यासह आवश्यक त्या वृक्षांचे पुनर्रोपण करून, पर्याय म्हणून नवीन झाडे लावण्याचे निर्देशही दिले. या महाविद्यालय आणि रुग्णालयाचे सन १९६५ मध्ये बांधकाम करण्यात आले होते. १५ एकर जागेमध्ये पसरलेल्या या महाविद्यालयाला २८ हेरिटेज आणि ३९२ नॉन हेरिटेज वृक्ष कापण्याची परवानगी हवी आहे. डॉ. चौधरी यांनी संबंधित विभागांना हेरीटेज वृक्ष वाचविण्याचे निर्देश दिले.

लाडकी बहीण

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतलेल्या १४ हजार पुरुषांना पैसे परत करण्याची नोटीस राज्य सरकारनं पाठवली आहे. महिनाभरात पैसे परत नाही दिले नाही तर गुन्हा दाखल करण्याचा इशारा सरकारनं त्यांना नोटीशीद्वारे दिला आहे. योजना सुरू झाल्यापासून सुमारे साडे २१ कोटी रुपये या पुरुषांच्या खात्यात जमा झाले आहेत.

आपली बसची’ फेरी

प्रवाशांची संख्या व त्यांची मागणी लक्षात घेऊन नागपूर महानगरपालिकेच्या वाहतूक विभागाने बर्डी ते बुटीबोरी गावापर्यंत ‘आपली बसची’ फेरी सुरू करण्यात आली आहे. सीताबर्डी (मोरभवन)

इथून बुटीबोरी पर्यंत जाणाऱ्यांची तसेच तिथून येणाऱ्यांची संख्या मोठी आहे. या मार्गावर थेट बर्डीवरून बुटीबोरीपर्यंत आपली बस फेरी आवश्यक होती. बस क्रमांक २०९ च्या दररोज जवळपास अर्ध्या तासाच्या अंतराने ही बससेवा प्रवाशांना उपलब्ध राहणार आहे

हवामान

राज्यात गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने पुन्हा एकदा जोरदार हजेरी लावण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विदर्भ, मराठवाडा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात पावसाचे ढग दाटून येत आहेत. राज्यातील अनेक जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे. ५ ते ८ ऑगस्टदरम्यान विदर्भातील नागपूर, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यांमध्ये पावसाचा इशारा दिला आहे. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये आज तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

कसोटी क्रिकेट

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेत इंग्लंडबरोबर साधलेल्या गुणांच्या बरोबरीमुळे भारतीय संघ जागतिक कसोटी अजिंक्यपदाच्या गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. ओव्हल इथे झालेल्या या कसोटी सामन्यापूर्वी इंग्लंड गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर होता. काल झालेल्या या मालिकेतल्या शेवटच्या सामन्यात भारतानं इंग्लंडवर विजय मिळवत २-२ अशी बरोबरी साधली. ५ गडी बाद करणारा मोहम्मद सिराज हा सामनावीर ठरला. शुभमन गिल आणि हॅरी ब्रुक हे दोघं मालिकावीर ठरले. या विजयामुळे भारताच्या खात्यात १२ गुणांची भर पडली असून भारतीय संघ आता तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. ऑस्ट्रेलियाचा संघ या गुणतालिकेत आघाडीवर आहे.

सत्यपाल मलिक

जम्मू काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचं आज प्रदीर्घ आजारानंतर निधन झालं. ते एकोणऐंशी वर्षांचे होते. नवी दिल्लीच्या राममनोहर लोहिया रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. संविधानाचं ३७०वं कलम रद्द करुन जम्मूकाश्मीरचा विशेष दर्जा काढून घेण्याची कारवाई सत्यपाल मलिक यांच्या कार्यकाळात झाली होती. मलिक यांच्या राजकीय कारकिर्दीला १९७४ मधे उत्तरप्रदेश विधानसभेतून प्रारंभ झाला. त्यानंतर त्यांनी अनेकदा राज्यसभेत उत्तरप्रदेशचं प्रतिनिधित्व केलं. लोकसभेत ते अलिगढ मतदारसंघातून जनता दलाच्या तिकिटावर निवडून गेले होते. बिहार, ओदिशा, गोवा आणि मेघालयचं राज्यपालपदही त्यांनी भूषवलं होतं.

सैन्य स्पष्टीकरण

नागपूरमध्ये एका मद्यधुंद सैनिकानं आपल्या वाहनाखाली नागरिकांना चिरडल्याची प्रसार माध्यमावर फिरत असलेली बातमी खोटी असल्याचं भारतीय लष्करानं स्पष्ट केलं आहे. जिल्ह्यातल्या नागरधन इथं रविवारी घडलेल्या घटनेचं वृत्तसंस्थांनी चुकीचं वार्तांकन केलं, असंही लष्करानं स्थानिक पोलिसांकडून घटनेची खरी माहिती घेऊन स्पष्ट केलं आहे. सध्या सुट्टीवर असलेला लष्करातला जवान रविवारी घरी परतत असताना पार्किंगवरून त्याचा स्थानिकांशी वाद झाला. नंतर त्याची चारचाकी झाडाला धडकून अपघात झाला होता. मात्र, या अपघातात कोणत्याही नागरिकाला इजा झाली नव्हती. या हवालदाराने त्याचा पाठलाग करणाऱ्या स्थानिकांविरोधात पोलिसात तक्रार दाखल केल्याचं लष्करानं म्हटलं आहे.

परीक्षा पे चर्चा'

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारानं सुरू झालेल्या 'परीक्षा पे चर्चा' या उपक्रमाला गिनेसच्या जागतिक विक्रमांच्या यादीत स्थान मिळालं आहे. 'नागरिकांचा सहभाग असलेल्या ऑनलाइन प्रणालीवर एका महिन्यात सर्वाधिक नोंदणीचा' जागतिक विक्रम परीक्षा पे चर्चानं केला आहे. mygov या प्रणालीवर परीक्षा पे चर्चा च्या आठव्या भागासाठी तीन कोटी ५३ लाख नागरिकांनी नोंदणी केली होती. त्याची दखल घेऊन गिनेसनं जागतिक विक्रमांच्या यादीत नोंद केली आहे. या जागतिक विक्रमाबाबतचं अधिकृत प्रमाणपत्र नवी दिल्लीत काल प्रदान करण्यात आलं. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, रेल्वे आणि माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव या कार्यक्रमाला उपस्थित होते.

*****